सरकारतर्फे साक्षदार क्रमांक ६ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि,
नाव – रविंद्र यादवराव बकाल,
वय – ५८ वर्ष, व्यवसाय – ए.एस.आय. बं.नं.८०३,
राह. – वृंदावन कॉलनी, नागपूर, जिल्हा नागपूर. मो. नं. ९८२३१६८९६४

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे शासकिय अभियोक्ता श्री. बी. एम. भगत द्वारा –**

१. मी दोन्ही आरोपीस ओळखतो. मी सन २०२० ते २०२४ या दरम्यान मौदा पोलिस स्टेशन येथे पोलिस हेड कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होतो. गुन्हा क्रं. ६४४/२१ चा तपास माझ्याकडे दिनांक २३.१०.२०२१ रोजी देण्यात आला होता. सदरचा गुन्हा भा.द.वी. कलम ३२४,३३६,५०६ सहकलम ३४ अन्वये दाखल करण्यात आला होता. माझ्याकडे सदर गुन्हयाच्या तपास देण्यात आला तेव्हा, गुन्हयातील प्रथम खबरी अहवाल, फिर्याद, वैद्यकीय प्रमाणपत्र इत्यादी देण्यात आले होते. दिनांक २३.१०.२०२१ रोजी मी दोन पंचासमक्ष घटनास्थळावर गेलो. घटनास्थळ भूगांव येथे फिर्यादीच्या घरासमोर होते. मी दोन पंचांना नोटीस देवून पंचनामा करणेकामी बोलावून घेतले होते. आता मला निशाणी क्रं २९ वरील नोटीस दाखविण्यात आली. सदरचे नोटीस मी पंचाना दिलेली नोटीस असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे व त्यावर माझी सही आहे. घटनास्थळावर दोन लाल रंगाचा फुटलेल्या विटा होत्या. मी सदरचा दोन्ही विटा पंचासमक्ष पंचनामा करुन ताब्यात घेतल्या. आता मला निशाणी क्रं २८ वरील पंचनामा दाखविण्यात आला, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे व त्यावर माझी सही आहे. मी पोलिसांना विटाचे क्वेरी रिर्पोट देण्याताबाबत पत्र पाठविले होते. आता मला दिनांक १८.११.२०२१ रोजीचे पत्र दाखविण्यात आले, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे व त्यावर माझी सही आहे. सदर पत्रास **निशाणी क्रं ४२** देण्यात येत आहे. साक्षीदारांचे जवाब नोंदविले.

२. साक्षीदार नामे दिलीप काशीनाथ पालवे याचा जवाब त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला होता. आता मला सदर साक्षीदाराच्या जबाबातील रेखांकित मजकूर अ

दाखविण्यात आले. सदरचा मजकूर साक्षीदाराने जबाब देतांना मला सांगितला होता व तो खरा व बरोबर आहे. रेखांकित मजकूर अ यास **निशाणी क्रं ४३** देण्यात येत आहे.

३. साक्षीदार नामे महेश सोपान सुर्यवंशी याचा जवाब त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला होता. आता मला सदर साक्षीदाराच्या जबाबातील रेखांकित मजकूर अ दाखविण्यात आले. सदरचा मजकूर साक्षीदाराने जबाब देतांना मला सांगितला होता व तो खरा व बरोबर आहे. रेखांकित मजकूर अ यास **निशाणी क्रं ४४** देण्यात येत आहे.

४. आरोपी विरोधात तपासाअंती पुरावा मिळून आल्याने, मी त्याच्या विरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीने फिर्यादीस विटा फेकून मारुन त्यास दुखापत केल्याचे दिसून आल्याने मी दोषारोपपत्र दाखल केले. आज दोन्ही आरोपी न्यायालयात हजर आहे.

**आरोपीच्या वकिलाचा वारंवार पुकारा केला असता वकिल गैरहजर सबब सदर साक्षीदाराचा आरोपीकडून उलटतपास नाही.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत. समक्ष

मौदा. **स्वाक्षरी/–**

दिनांक २०.१२.२०२५ (एल.एम. पठाण)

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग मौदा